
# पालि पकासो

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.


(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०20 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# पालि पकासो

## इयत्ता बारावी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४

B9Z8U2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पहिले पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**पालि भाषा तज्ज्ञ समिती**

डॉ. विमलकिर्ती, नागपूर (अध्यक्ष)
श्री. माधव मेश्राम, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. अशोक पैठणे, अमरावती (सदस्य)
डॉ. संतोष भोसले, औरंगाबाद (सदस्य)
श्री. पंजाब प्रधान, उल्हासनगर (सदस्य)
डॉ. मोहन वानखडे, नागपूर (सदस्य)
श्री. किर्तीराज लोणारे, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. सोपान पठाडे, यवतमाळ (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**पालि भाषा अभ्यासगट सदस्य**

डॉ. योजना भगत
डॉ. विश्वनाथ चौरपगार
श्रीमती. तृप्तीराणी तायडे
श्री. रामकृष्ण तागडे
श्रीमती. विणा नकाते
श्रीमती. निरुपमा भोरे
श्री. पुरुषोत्तम सिरसाठ
श्री. दिलीप सोनोने
श्री. प्रभुदास तायडे
श्री. विश्वजीत रगडे
डॉ. मनीष आनंद
डॉ. बालाजी गव्हाळे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. यशवंत देशमुख, चित्रकार, पुणे

**अक्षरजुळणी**

भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**संयोजन**

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. राजेंद्र चिंदरकर**
निर्मिती अधिकारी
**श्री. राजेंद्र पांडलोसकर**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५.

# “भारतस्स संविधान”

## उद्देसिका

**मयं, भारतस्स लोक,** भारतस्स एको **बाहुभूमिकं**
**सङ्गणिकावादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्ज** रचयतिस्स
च तस्स सब्बे नागरिकानं;
**बाहुजञ्ञ, वित्तिय, च राजनेत्तिक ञाय;**
**वितक्क अभिवेत्ति, विस्सास, सद्धा**
**च उपासना एस्स विमुत्ति;**
**दज्जस च सन्धीस्स समानत्त;**
**एकंस पापेतु कत्वानं ददातिस्स च**
**तं सब्बेस्मिं पुग्गलस्स पतिट्ठा**
**च रट्ठस्स समग्गी च सामग्गीयं**
**एस्स आन दातु बन्धूता**
पवड्ढितुं कितस्स सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्प कत्वानं;
**अम्हाकं संविधान सभास्मिं**
अज्ज दिवांङ्क सव्वीसति कत्तिक, एकूनवीसति एकूनपञ्ञासति दिने
इत्थं अयं **संविधान अधिकत च अधिनियत**
कत्वान **सयं पत समप्पयाम.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

## पटिञ्ञा

भारतो मम देसो ।
सब्बे च भारतीया मम बान्धवा ।
अत्थि देसविसये मे पेमं ।
मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानि ।
एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळ्हपरक्कमो भविस्सामि ।
अहं मातापितुन्नं च आचरियानं च पाचरियानं च
वयो-अनुप्पत्तानं सक्करिस्सामि ।
सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।
अहं देसविसये देसबान्धवविसये च दळ्हभत्तिं
पटिजानामि ।
यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि
यं तेसं सुखं तं मे सुखं।

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हा सर्वांचे इयत्ता बारावीच्या वर्गात स्वागत आहे. '**पालि पकासो**' हे इयत्ता बारावी पालि पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद होत आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यानंतर आपल्या लक्षात येईल, की स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या संविधानिक मूल्यांची जाणीव आपल्यामध्ये व्हावी, या दृष्टीने पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठ्यघटकावरील स्वाध्यायांचे स्वरूप आणि त्यामधील विविधता, यामुळे पाठ्यघटकांचे अंतरंग समजून घेण्यास विशेष मदत होऊ शकते. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने स्वाध्यायांतील कृतींची रचना करण्यात आलेली आहे. याच दृष्टीने गद्य-पद्य पाठांची निवड करण्यात आलेली असून त्यातील रंजकता व सुलभता यावर भर देण्यात आलेला आहे. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना विद्यार्थ्याला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही, पाठांतराचे दडपणही राहणार नाही, अशा प्रकारची या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कृतिपत्रिकेच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भाषेच्या अध्ययनाची आवड निर्माण होईल, विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया शीलप्रज्ञेनेयुक्त होऊन ज्ञानरचनात्मक पद्धतीने गतिमान होण्यास मदत होईल. पाठ्यपुस्तकात दिलेल्या चित्रांमधून तत्कालीन पोशाख, आभूषणे, राहणीमान, जीवनपद्धती इत्यादीबाबतची माहिती सहजतेने होईल. तसेच अभ्यासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती परिशिष्टे देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, ते सदाचारी व्हावेत हा हेतू डोळ्यांसमोर ठेऊनच पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. भिक्खू-भिक्खूनी संघाची संपूर्ण कार्यप्रणाली लोकशाही स्वरूपाची होती. वेगवेगळ्या कुळातून, जातीतून, धर्मातून, प्रांतातून आलेले लोक संघात प्रव्रज्जित झाल्यानंतर ते आपले सर्व भेद विसरून त्यांची केवळ 'शाक्यपुत्रीय श्रमण-श्रमणी म्हणून ओळख असायची, यामधून आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मिळतो. 'चरियापिटक' या घटकातून कठिणातील कठीण कार्य करण्याचे, आपत्तीला तोंड देण्याचे, सुख-दु:खात समभावाने राहण्याचे विचार दिसून येतात. सर्वच पाठ्यघटक असे आहेत, की जे आपल्याला सुसंस्कृत आचरण करण्यास प्रेरित करतात.

पाठ्यघटकासंबंधी माहिती मिळविण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू.आर. कोडद्वारे उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल. त्याचा आपणाला अभ्यासासाठी निश्चितपणे उपयोग होईल.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या कामी पालि भाषा तज्ज्ञ समिती, पालि भाषा अभ्यासगट सदस्य या सर्वांनी परिश्रम घेऊन पाठ्यपुस्तक तयार केले आहे. पालि भाषेचे शिक्षक व तज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

भाषेच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांची नैतिकता, विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्य, परोपकार भावना, स्वमत प्रकटीकरण आणि राष्ट्रीय मूल्ये यांच्या विकासासाठी '**पालि पकासो**' हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल. तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे
दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०२०
भारतीय सौर दिनांक : २ फाल्गुन, १९४१

# भाषाविषयक क्षमता : पालि

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषाविषयक खालील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | | क्षमता |
|---|---|---|
| श्रवण | • | पालि तिपिटक साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे. |
| | • | पालि भाषेतील विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यांतील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे. |
| | • | पालि भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद, संभाषण व व्याख्याने ऐकून चिकित्सक विचारासह त्यात सहभागी होता येणे. |
| | • | आपल्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| | • | आंतरजालावरून लिंक्स्, क्यू. आर. कोड, व्हिडिओज, यू-ट्यूब व प्रसारमाध्यमे, दृकश्राव्य इत्यादी माध्यमांतून अपेक्षित व अध्ययनपूरक संदर्भ विकसित करणे. |
| भाषण-संभाषण | • | पालि भाषेतील उच्चारवैशिष्ट्यांना अनुसरून तिपिटकातील गाथांचे पठण आणि संभाषण करता येणे. |
| | • | पाठ्यपुस्तकात अंतर्भूत असलेल्या घटकांचे सादरीकरण करता येणे. |
| | • | विषयाला अनुसरून स्वत:चे स्वतंत्र विचार संदर्भासह मांडता येणे. |
| | • | पालि भाषेतील अध्ययन कृतींना विषयाला अनुसरून अनुभव कथन करता येणे. |
| | • | पालि भाषेत एकमेकांशी संभाषण करता येणे. |
| वाचन | • | योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन प्रकट वाचन करता येणे. |
| | • | पालि साहित्यातील तिपिटक व अनुपिटक साहित्यप्रकारांचे वाचन करून त्याचा आस्वाद घेणे. |
| | • | संकेतस्थळावरील ई-बुक्स, ई-साहित्य शोधून वाचन करता येणे व त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करून त्याची पूर्वज्ञानाशी सांगड घालता येणे. |
| | • | पाठाशी संबंधित मूळ साहित्य व संदर्भीय साहित्याचे वाचन करणे. |
| लेखन | • | लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे. |
| | • | भाषा नियमांना अनुसरून संवाद, वर्णन, लघुपरिच्छेद लिहिता येणे. |
| | • | माध्यमभाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद लेखन व उपयोजित लेखनाचे तंत्र प्राप्त करणे. |
| | • | लेखननियमांनुसार मुद्रितशोधनाचे कौशल्य प्राप्त करणे. |
| | • | पाठाचा आशय व विचार याबाबत स्पष्टीकरणासह स्वत:चे मत स्वत:च्या भाषेत समर्पक शब्दांत लिहिता येणे. |
| अध्ययन कौशल्य | • | कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश अभ्यासता येणे. |
| | • | पालि भाषेत जालरेखाचित्र निर्माण करता येणे. |
| | • | पालि भाषेत कथापूर्ती करता येणे. |
| | • | पालि भाषेत माध्यमभाषेचा अनुवाद करता येणे. |
| | • | बहुभाषा परिचय करून घेण्याची जिज्ञासा निर्माण होणे. |
| | • | संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ई-साहित्याचा, ॲप्लीकेशनचा उत्तमरीत्या कृतियुक्त वापर अभ्यासासाठी करता येणे. |
| भाषाभ्यास | • | इयत्ता बारावीत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे. |
| | • | काळ, काळाचे उपप्रकार, संधी, समास, विशेषण, अव्यय, वाक्यात उपयोग इत्यादी घटक जाणून घेणे. |
| | • | ०१ ते १०० अंक (क्रम) जाणून घेणे. |
| | • | निबंध, अपठित व कथापूर्ती याचे उपयोजन कौशल्यपूर्ण रीतीने करता येणे. |
| | • | पालि भाषेत संवाद करता येणे. |

## शिक्षकांसाठी

**'पालि पकासो'** इयत्ता बारावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील कौशल्ये, नैतिक मूल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार रुजवता येतील अशा पाठ्यघटकांचा पाठ्यपुस्तकात समावेश केलेला आहे. पाठ्यघटकांमधील आशय विद्यार्थ्यांना सहजतेने स्पष्ट व्हावा या दृष्टीने आशयानुरूप पाठ्यघटकांमध्ये चित्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या कृतीबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करून घ्यावेत.

गद्य-पद्य पाठ निवडतांना काही चिरंतन मूल्ये आणि तत्त्वांचा विचार करण्यात आलेला आहे. पाठ्यघटकांची माहिती व्हावी म्हणून पाठ्यघटकाआधी त्याची सारांशरूपात प्रस्तावना देण्यात आलेली आहे. ही प्रस्तावना त्या पाठ्य घटकाचे सार आहे. शिक्षकांनी ही प्रस्तावना अधिक स्पष्ट करताना, पाठ्यघटकांशी संबंधित पालि साहित्यातील इतर संदर्भांचा सुद्धा अध्ययन-अध्यापनात समावेश व्हावा, यासाठी काही पालि संदर्भ ग्रंथांची यादी पाठ्यपुस्तकात देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना लेखन-वाचन कौशल्य विकासासाठी पाठ्यपुस्तकातील घटकनिहाय कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. विद्यार्थ्यांना पालि भाषा शिकण्याकरिता, शिकवण्याकरिता या कृती घटकांचा विशेष उपयोग होऊ शकतो. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्य विकसित होणार आहेत. इयत्ता बारावीतील लेखन घटकांची मांडणी करतांना विद्यार्थ्यांना ते सहजतेने समजेल याची दक्षता घेण्यात आलेली आहे. शिक्षकांनी प्रत्येक पाठ्यघटक विद्यार्थ्यांना समजून सांगतांना ते त्याला चांगल्या प्रकारे आकलन होईल या दृष्टीने स्वकौशल्य विकसित केल्यास, विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषा शिकण्याची आवड निर्माण होईल.

या पाठ्यघटकांमध्ये व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी सहज, सुलभ व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व विद्यार्थ्यांकडून तसा सराव करून घ्यावा.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करायचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे - परियति, पटिपत्ति व पटिवेदन. परियति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा करणे, विचार-विमर्ष करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे. पालिमधील शब्दांचे असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही, तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययनाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही, की इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा-कथन इत्यादीपुरताच मर्यादित असतो; परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते. ज्याला 'नवाङ्गसत्थुसासन' असे सुद्धा म्हणतात. म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने उपलब्ध आहेत. या सर्वांचा उपयोग आपल्याला अध्यापनामध्ये निश्चित रूपाने होऊ शकतो.

पालि भाषा शिकतांना-शिकवितांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे, ती आपल्याला कशा पद्धतीने समजून घेता येईल, ती बोलचालची भाषा कशी होईल? या दृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यामध्ये शिक्षकाचे अध्ययन-अध्यापन निश्चित रूपाने दिशादर्शक ठरू शकते. कारण प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, जीवनमूल्ये समजून घेण्याच्या दृष्टिने पालि भाषेचे फार महत्त्व आहे. पालि भाषेच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. म्हणून असे म्हणता येईल, की आधुनिक भारतात पालि भाषेच्या अध्ययनाचे क्षेत्र निश्चितच व्यापक होत आहे. यामध्ये शिक्षक म्हणून आपले योगदान या विषयाला क्रमप्राप्त आहे. म्हणून शिक्षकांनी स्वतःच्या सृजनशीलतेने, कल्पकतेने या पाठ्यघटकांचे अध्यापन करून विद्यार्थ्यांना पालि विषयाच्या अध्ययनासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, विचारक्षमता व कृतीशीलता यांना ही गती प्राप्त होईल. शिक्षक हा केवळ पाठ्यघटकच शिकवत नसतो तर विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण गुणांची वाढ कशी करता येईल? त्यांच्यामधील न्यूनगंड कसा काढता येईल? त्याला समाजाभिमुख कसे करता येईल? ही मूल्ये सुद्धा पाठ्यघटकाच्या अनुषंगाने शिकवत असतो. विद्यार्थ्यांच्या चुकाच न दाखवता त्यांच्यामधील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याची स्तुती करणेही गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक कृती चांगल्याप्रकारे करण्याची प्रेरणा मिळते.

मानवी मूल्यांची जपवणूक व संवर्धन करण्याची फार मोठी जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्या सर्वांवर आहे, कारण या मूल्यांचे बीजारोपण जर आपण विद्यार्थ्यांवर योग्यपणे केले तर उद्याची सशक्त पिढी आपल्या हातून घडणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करुन अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगिण व्यक्तिमत्त्व अधिक कुशल पद्धतीने विकसित होण्यास मदत होईल व शिक्षकांना सुद्धा एक निकोप, सुदृढ व सम्यक विद्यार्थी घडविण्याचे समाधान प्राप्त होईल.

**'पालि पकासो'** इयत्ता बारावीचे हे पाठ्यपुस्तक आपणास निश्चितच आवडेल, अशी अपेक्षा आहे.

# पाठानुक्कमो


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| | **गज्जो खन्धको** | |
| १) | सङ्घसामग्गी सुत्त | १ |
| २) | रथो नाम किं? | ३ |
| ३) | विनिच्छय महामत्त वत्थु | ६ |
| ४) | जनकेन तनया ओवादं | १० |
| ५) | बहुजनसङ्कटको छत्तपति सिवाजि महाराञ्ञो | १३ |
| ६) | पियदस्सि असोकस्स थम्भलेखा | १८ |
| ७) | चत्तारि दस्सनियानि ठानानि | २१ |
| ८) | वनरक्खको बोधिसत्तो | २४ |
| | **पज्जो खन्धको** | |
| १) | सिगालसुत्त | २७ |
| २) | सीलानिसंसा | ३० |
| ३) | वसलसुत्त | ३३ |
| ४) | सुनीत थेरो | ३६ |
| ५) | रुरुराजचरियं | ३९ |
| ६) | इणसुत्त | ४२ |
| ७) | अम्बपाली थेरी | ४६ |
| ८) | पकिण्णानि सुभासितानि | ४९ |
| | **थुलवाचन खन्धको** | |
| १) | पाचीन विस्सविज्जालयो | ५३ |
| २) | पटाचारा थेरी अपदानं | ५८ |

| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| | **परिसिट्ठं** | |
| १) | **वेय्याकरण (व्याकरण)** | ६१ ते ७१ |
| | १) सरं च व्यञ्जनं च वग्गिकरणं<br>२) व्यञ्जन परिवत्तनं ३) काळ प्रत्यय ४) सन्धी<br>५) धातुरुपाविषयी माहिती ६) समास ७) अव्यय | |
| २) | **सुलभो पालि** (सुलभ पालि) | ७२ ते ८२ |
| | १) सरीरस्स अवयवानि<br>२) ञातिगणा ३) वण्णानि(रंगानि) ४) रसानि<br>५) गेहसेवक पसु ६) तिरच्छाना ७) जलथलगोचरा<br>८) किमी ९) सकुणा<br>१०) फलफलानि च पुप्फानि च ११) यानानि<br>१२) आयुधं (हत्यारे) १३) संख्या (अंक) | |
| ३) | **संवाद कौशल्य, निबन्धो** (निबंध) | ८३ ते ८६ |
| ४) | **अपठितो** (अपठित उतारे) | ८७ ते ९६ |
| | **गज्ज विभागो–** १) सुंसुमार जातकं<br>२) सठस्स पटिसाठेय्यं<br>३) कम्मेनेव सिद्धि न नामेन<br>४) चीनदेसिय पवासि–युवानच्वांग<br>५) सीहो च सकुणो च<br>**पज्ज विभागो–** १) सम्मापणिहितं चित्तं<br>२) पुण्णिका थेरी<br>३) चंपा नगरी<br>४) पराभव सुत्त<br>५) गोतमचरियं | |
| ५) | **कथापुत्ती** (कथापूर्ती) | ९७ ते ९८ |
| | १) बकजातकं २) नक्खतजातकं<br>३) कलहो हि विनासमुलो ४) सीलविमंसनं | |
| ६) | **पालि भाषेचे महत्त्व** | ९९ ते १०३ |
| ७) | **भारतातील अशोक कालीन शिलालेखातील अक्षरे** | १०४ |